**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**गोदावरी संवर्धन कक्ष विभाग**

**मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. १७६/२०१२ चे अनुषंगाने नाशिक मनपा. उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त**

मा. उच्च न्यायालय मुंबई येथील जनहित याचिका क्र. १७६/२०१२ संदर्भात नाशिक महानगरपालिका स्तरावरील उपसमितीची बैठक मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांचे अध्यक्षतेखाली दि.३१/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. आयुक्त सो. यांचे दालनात संपन्न झाली.

सदर बैठकीस खालील अधिकारी यांनी उपस्थिती नोंदविली .

१. मा. आयुक्त सो., मनपा नाशिक
२. मा. माहिती उपसंचालक, नाशिक
३. मा. पोलिस उपायुक्त, नाशिक
४. मा. उपआयुक्त (गोसंक), मनपा नाशिक
५. मा. उपआयुक्त (अतिक्रमण), मनपा नाशिक
६. मा. शहर अभियंता, मनपा नाशिक
७. मा. सहा. संचालक, नगरनियोजन, मनपा नाशिक
८. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी
९. मा. संचालक, घनकचरा व्यवस्थापन, मनपा नाशिक
१०. मा. अधिक्षक अभियंता (मलनि), मनपा नाशिक
११. मा. अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), मनपा नाशिक
१२. मा. कार्यकारी अभियंता, पर्यावरण, मनपा नाशिक
१३. मा. कार्यकारी अभियंता, (मलनि), मनपा नाशिक
१४. मा. कार्यकारी अभियंता (यांत्रिकी), मनपा नाशिक
१५. विभागीय स्वच्छता निरिक्षक, नाशिक पश्चिम, मनपा नाशिक
१६. श्री. निशिकांत पगारे, अशासकीय सदस्य

सदर उपसमितीच्या बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थित केलेल्या मुद्यांवर चर्चा झाली.

| अ.क्र. | विभागाचे नाव | खुलासा |
|---|---|---|
| १ | मलनिःसारण विभाग | • नमामि गंगे प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यासाठीचा Base map करावयाचे कामकाज सुरु आहे. सर्व्हे झालेला असुन ३० ते ४० टक्के काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम झाल्यावर ३ ते ४ महिन्यात डी.पी.आर. सादर करण्याचे नियोजन आहे.<br>नाशिक महानगरपालिकेचे सद्यस्थितीत ६ ठिकाणी STP प्लांट आहेत. पैकी तपावेन, पंचक, आगरटाकळी व चेहडी हे STP तत्कालीन CPCB/MPCB च्या मापदंडानुसार बांधण्यात आलेले आहे. दरम्यानच्या काळात CPCB/MPCB ने STP मध्ये प्रकियेनंतर सोडण्यात येणाऱ्या मलजलाच्या निकषांमध्ये बदल करुन ते अधिक कठिण केले आहे. त्या अनुषंगाने नविन मापदंडानुसार मलजल प्रक्रिया केंद्र अद्यावत करणेसाठी वरिल ४ प्रक्रिया केंद्रांचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र |

| | | |
|---|---|---|
| | | शासनामार्फत मंजुर करुन राष्ट्रिय नदी संवर्धन संचालनालय (NRCD) नवी दिल्ली येथे मंजुरीसाठी सादर केला आहे. IIT Roorkee यांचे मार्फत सदर सविस्तर प्रकल्प अहवाल प्रमाणित (Vetting) करणेची कार्यवाही सुरु आहे.<br>राष्ट्रिय नदी संवर्धन संचालनालयाकडून अद्याप पावेतो मान्यता मिळाली नसल्याने तसेच येत्या सिंहस्थ कुंभ मेळयाच्या दृष्टीने वरिल पैकी तपोवन व आगरटाकळी STP Up-gradation चा प्रस्तावाचा अमृत-२.० योजनेत समावेश करण्यात आला आहे. तपावेन व आगरटाकळी प्रस्तावांना मा. केंद्रीय शिखर समीतीची मान्यता माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये दिली असुन मुख्य अभियंता, म.जि.प्रा., नाशिक यांचे दि.२३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्यांना तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे. दि.२३.०३.२०२३ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक समितीची बैठक होऊन सदर प्रकल्यांना मान्यता दिली आहे. तांत्रिक मान्यता देतांना टाकलेल्या अटीशर्ती नुसार सदर प्रकल्पाचे डिझाईन हे आय.आय.टी. पवई, मुंबई यांचेकडून प्रमाणित (Vetting) करणेचे काम सुरु आहे. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर प्रकल्यांना प्रशाकीय मान्यता मिळणेकामी मनपा मार्फत दि. ११.०४.२०२३ रोजी पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.<br><br>• मा.आयुक्त सो. यांनी गोदावरी नदीत मिसळणारे ड्रेनेजचे पाणी बंद करणे बाबत त्वरित कार्यवाही करणेबाबत सूचना दिल्या.<br><br>• श्री. निशिकांत पगारे यांच्या तक्रारी नुसार मागील वर्षी मे महिन्यात तत्कालीन आयुक्त सो. श्री.पवार साहेब यांचे समवेत बोटीने पाहणी केली होती. मनपाने सर्व्हे केलेल्या नदीपात्रात मिसळणाऱ्या ५० ठिकाणांची यादी मिळावी, त्याची पाहणी करावी याबाबत मागणी करण्यात आली होती. परंतु अद्यापही पाहणी झालेली नाही असा मुद्दा मांडला.<br>मलनिःसारण व सार्व.बांधकाम विभाग यांचे मार्फत एकत्रित पाहणी करण्यात आली. पावसाळी पाईपलाईन मधून सांडपाणी नाल्यात मिसळणाऱ्या अशा एकूण १०३ ठिकाणांची पाहणी करणेत आली. त्यापैकी ४३ ठिकाणी सांडपाणी वाहत असल्याचे आढळून आले. त्याअनुषंगाने आजपावेतो मलनिःसारण विभागामार्फत आवश्यक उपाय योजना करुन ३७ ठिकाणी नाल्यात वाहणारे सांडपाणी बंद करणेत आले असून उर्वरित ठिकाणांची कार्यवाही सुरु आहे. |

| | | |
|---|---|---|
| २ | घनकचरा व्यवस्थापन विभाग | दिनांक ०१/०४/२०२३ ते दि.३०/०६/२०२३ पावेतो ५८ नागरिकांवर दंडात्मक कारवाई करून र.रु.३०,४६०/- इतका दंड वसूल करण्यात येऊन सदर बाबतचा अहवाल मनपा संकेतस्थळावर टाकण्यात आला आहे.<br>C & D waste बाबत घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत विभागानुसार ६ वाहनांद्वारे C & D waste संकलित करून खत प्रकल्पा लगत प्रस्तावित C & D प्लांट येथे वाहून नेण्यात येत आहे. C & D प्रकल्पाच्या कामाचा कार्यादेश नुकताच देण्यात आला असून काम प्रगती पथावर आहे. |
| ३ | नगरनियोजन विभाग | रेन वॉटर हार्वेस्टींग बाबत नियमित कार्यवाही सुरु आहे. नाशिक मनपा क्षेत्रामध्ये नवीन बांधकामास रेन वॉटर हार्वेस्टींग बंधनकारक करण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष जागेवर जाऊन ५५० मिळकती तपासणी करून सुमारे १.३८ लक्ष रुपयांपावेतो दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.<br>सदरची मोहीम नियमितपणे राबविण्यात येत आहे.<br>रेड लाईन, ब्ल्यु लाईन बाबत मॅपिंगचे काम सुरु आहे.<br>प्राप्त तक्रारींबाबत माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल.<br>इमारत पुर्नबांधणी करतेवेळी मोठ्या प्रमाणावर C & D waste निर्माण होतो. सदर C & D waste चे योग्य पद्धतीने विल्हेवाट व्हावी म्हणून अशा बांधकाम परवानगी दिलेला प्रस्तावांची यादी नगरनियोजन विभागाने संबंधित कार्यक्षेत्राच्या विभागीय अधिकारी यांना कळविणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केले. |
| ४ | सार्व.बांधकाम विभाग | नाशिक शहरात एकूण ५४ पूल असून त्यापैकी १३ पूल हे High Flood Level च्या वर असून त्यापैकी सद्यस्थितीत २ पुलांवर जाळ्या बसविण्यात आल्या आहेत. उर्वरित पुलांवर जाळ्या बसविणेबाबत पाहणी करून निविदा प्रक्रियेची कार्यवाही केली जाईल.<br>शहरातील सर्व नद्यांच्या पुलांवर, घाटांवर तसेच दर्शनी भागांवर नदीपात्रात प्रदुषण न करणे व दंडात्मक कारवाई बाबत फलक लावणेत आलेले आहेत. पुन्हा पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी फलक लावणे बाबत कार्यवाही केली जाईल.<br>श्री गणेश उत्सवासाठी ठिकठिकाणी श्री गणेश विसर्जनाकरिता कृत्रिम तलावासाठी जागेंची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था केली जाईल. |
| ५ | अतिक्रमण विभाग | नदी किनाऱ्यावरील अतिक्रमण होत असलेल्या ठिकाणांची पाहणी करून सर्व विभागीय अधिकारी यांनी सदर बाबतचा गोषवारा तयार करुन तो अतिक्रमण विभागास पुढिल कार्यवाहीकरिता सादर करणेच्या सूचना श्री.नेर उपआयुक्त अतिक्रमण यांनी दिल्या. |

| | | |
|---|---|---|
| ६ | शिक्षण विभाग | शिक्षण विभागाकडून जनजागृती करणेकामी विविध उपक्रम राबविले जातात. जसे कि, प्रार्थनेच्या वेळी गोदागीत गायले जाते. गोदावरी प्रदूषण होऊ नये याकामी विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आलेले आहे. सर्व संबंधित कार्यक्रमांची माहिती नाशिक मनपाच्या संकेतस्थळावर वर प्रसिध्द केली जाते. |
| ७ | स्मार्ट सिटी विभाग | पंचवटी येथील स्मशानभूमी येथे गॅबियान वॉल बांधणेबाबत नियोजन असून सदर विषय स्मार्ट सिटी समितीवर ठेवणेत आला आहे.<br>रामकुंड गोदाघाट येथे वाहनतळाचे नियोजन करण्यात येत आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर बरीकेटस लावणेची कार्यवाही करणेत येईल. |
| ८ | जिल्हा माहिती अधिकारी | नाशिक महानगरपालीके मार्फत गोदावरी नदी प्रदूषण कमी करणेकामी केलेल्या कार्यावाहीबाबतची माहिती जिल्हा माहिती अधिकारी यांचेकडेही प्रसिध्दी साठी देण्यात यावी. |

येणे प्रमाणे चर्चा होऊन बैठकीच्या शेवटी उपआयुक्त श्री.मुंडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.